# भारत सरकारच्या स्त्रियांसाठी योजना

**सुषमा तानाजी कुंभार,** संशोधक विद्यार्थी, राज्यशास्त्र विभाग शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

---

**प्रस्तावना**

भारत सरकारमार्फत महिलांच्या सक्षमीकरणासाठी अनेक योजना राबवण्यात येत आहे. भारतामध्ये १९५४ पासून महिलांच्या विकासासाठी सरकारी योजना सुरू झाल्या परंतु प्रत्यक्षात सहभाग १९७४ मध्ये सुरू झाला. देशाच्या प्रगतीमध्ये महिला आणि मुलांच्या विकासाचे सर्वोच्च महत्त्व ओळखून आपल्या पूर्वजांनी देशाची राज्यघटना तयार केली आहे. कारण मुले आणि महिलांचे सर्वोत्तम हित जाणून मुले व महिला महिलांसाठी कायदेही करण्यात आले आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात छत्रपती शाहू महाराज महात्मा फुले सावित्रीबाई फुले डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर इत्यादी अनेक महापुरुषांनी आपल्या राज्यातून सामाजिक क्रांतीची सुरुवात केली होती. महिला शिक्षणाची सुरुवात फुले दांपत्यांनी पुण्यातूनच केली. त्यावेळी त्यांना समाजाच्या मोठ्या रोशाला सामोरे जावे लागले होते पण तरीही सगळ्या प्रकारचा विरोध पत्करून त्यांनी स्त्री शिक्षणाची चळवळ सुरू ठेवली त्याचे फलस्वरूप आज सर्व क्षेत्रात महिला आघाडीवर असल्याचे आपणास दिसते. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर पासून महिलांचे कल्याण आणि सर्वांगीण विकास व्हावा या उद्देशाने अनेक कार्यक्रम राबविण्यात येत आहेत.

आज भारत विकसनशील अर्थव्यवस्थेतून चमकदार अर्थव्यवस्थेकडे वाटचाल करत आहे देशाच्या या प्रगती मागे महिलांचे मोठे योगदान आहे. एक काळ असा होता की महिलांसाठी घराबाहेर पडणेही फार कठीण होते .पण आता काळ बदलला आहे .महिला पुरुषांच्या खांद्याला खांद्या लावून प्रत्येक क्षेत्रात स्पर्धा करत आहेत. दुसरीकडे देशात आर्थिक दृष्ट्या अत्यंत दुर्बल असणाऱ्या महिलाआहेत. अशा परिस्थितीत महिलांना पुढे नेण्यासाठी केंद्र आणि राज्य सरकार विविध योजना राबवत आहे . भारत सरकार वेगवेगळ्या योजना राबवत आहे .या योजनांचा उद्देश देशातील महिलांना स्वयंरोजगारासाठी प्रोत्साहित करणे आणि त्यांना स्वावलंबी बनवणे हा आहे. भारत सरकारने अनेक योजना सुरू केली आहे ते विशेषतः महिलांसाठी आणि त्यांना त्यांचे योग्य सामाजिक सन्मान प्रदान करण्यासाठी आणि कमाईचे मार्ग सुनिश्चित करण्याचे यामागचे उद्दिष्ट आहे. भारतीय समाजाचा भूतकाळ लैंगिक असमानतेने भरलेला असल्याने सरकार प्रत्येक स्तरावर समानता आणण्यासाठी महिलांचे सक्षमीकरण करण्यासाठी उन्नतीसाठी पुढे आले आहे.

**संशोधन पद्धती**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी दुय्यम समतेचा वापर करण्यात आला आहे. त्यामध्ये प्रामुख्याने पुस्तके वर्तमानपत्रे व इंटरनेटवर वेबसाईट इत्यादीचा उपयोग करण्यात आला.

**उद्दिष्टे**

१) स्त्रियांसाठी राबवल्या जाणाऱ्या योजनेच्या स्वरूपा विषयी माहिती करून देणे.

२) सामाजिक व आर्थिक दृष्ट्या दुर्बल असणाऱ्या महिलांना योजनेविषयी माहिती देणे.

३) स्त्रियांसाठी राबवल्या जाणाऱ्या योजनांमधील उद्देश याविषयी माहिती करून देणे.

४) महिलांच्या सक्षमीकरणासाठी समाजात प्रागतिक दृष्टिकोन रुजवणे.

5) सर्व क्षेत्रांमध्ये समान संधी व विकासासाठी पोषक वातावरण ,साधने उपलब्ध करून देणे.

**१) मनोधैर्य योजना -**

मनोधैर्य योजनेची अंमलबजावणी अधिक परिणामकारक करण्यासाठी बलात्कार, बळी पडलेल्या स्त्रिया व लैंगिक अत्याचाराला बळी पडलेल्या बालकांचे पुनर्वसन व त्यांना अर्थसहाय्य करण्यासाठी या योजनेच्या बदलत्या नियमानुसार घटनेचा परिणाम म्हणून स्त्रिया किंवा बालकास कायमचे मते म्हणतो अथवा अपंगत्व आल्यास तसेच सामूहिक बलात्काराच्या प्रकरणात गंभीर इजा झाल्यास किंवा असिड हल्ल्यांमध्ये चेहरा विद्रूप झालाच दहा लाख रुपयांचे अर्थसाह्य देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

**२) मोफत शिलाई मशीन योजना -**

देशातील मोठा लोकसंख्येमध्ये गरीब व नोकरदार मुलांचा समावेश आहे या महिलांना रोजच्या गरजा पूर्ण करण्यासाठी अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. भारत सरकारने गरीब व कष्टकरी महिलांना मोफत शिलाई मशीन देण्याची योजना सुरू केली आहे. या योजनेअंतर्गत सरकार देशातील प्रत्येक राज्यात ५० हजार हून अधिक महिलांना मोफत शिलाई मशीन देते जेणेकरून त्यांना स्वतःचा रोजगार सुरू करता येईल.

**३) स्वाधार योजना**

या योजनेमध्ये निराधार, निराश्रित स्त्रिया, कैदी स्त्रिया ,नैसर्गिक आपत्तीमुळे निराधार झालेल्या स्त्रिया, अनैतिक व्यापारातून मुक्त केलेल्या लैंगिक अत्याचार झालेल्या, हुंडा ग्रस्त, एच आय व्ही पॉझिटिव्ह स्त्रियांना स्वेच्छेने प्रवेश दिला जातो. अन्न वस्त्र निवारे खेरीज या योजनेमध्ये आरोग्य सेवा, हेल्पलाइन ,व्यवसाय प्रशिक्षण ,मानसोपचार, समुपदेशनसारखे लाभ दिले जातात. या सर्व सहकार्यातून त्या स्त्रियांचे पुन्हा उत्तम रित्या पुनर्वसन व्हावे यासाठी प्रयत्न केला जातो.

**४) उज्वला योजना**

स्त्रिया व मुलींच्या अनैतिक व्यापार वाहतुकीतला घालण्यासाठी स्त्रिया आणि मुलींचे लैंगिक शोषण थांबवणे आणि अशा स्वरूपात पीडीत झालेल्या स्त्रिया आणि मुलींची सुटका करून त्यांना संरक्षण शिक्षण प्रशिक्षण देऊन त्यांचे पुनर्वसन करण्यासाठी ही योजना राबवली जाते.

**५) स्टेप- महिलांसाठी प्रशिक्षण व रोजगार कार्यक्रम**

आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील स्त्रियांमधील कौशल्य वाढवून त्यांची व्यावसायिक दृष्ट्या सक्षमता वाढवणे. हा योजनेचा उद्देश आहे. त्यामुळे स्त्रिया स्वतःच्या पायावर सक्षमपणे उभा राहू शकतात. या योजनेतपशुपालन ,दुग्ध व्यवसाय ,मत्स्यव्यवसाय, हस्तकला, खादी ग्रामोद्योग, रेशमी किड्यांचे पालन, या प्रकारच्या विषयातील प्रशिक्षण देण्यात येते ही योजना स्वयंसेवी संस्थांमार्फत चालविण्यात येते. योजने मध्ये केंद्र शासनाकडून एकूण खर्चाच्या ९० टक्के अनुदान प्रमाण मिळते उर्वरित दहा टक्के रक्कम स्वयंसेवी संस्थांना उभारायचे असते .या योजनेत कमीत कमी ५०० व जास्तीत जास्त १०००स्त्रिया असणे आवश्यक आहे.संस्थेला दोन हप्त्यात अनुदान दिले जाते. या योजनेअंतर्गत १६संस्था राज्यात कार्यरत आहे.

**६) बेटी बचाव बेटी पढाओ**

बेटी बचाव बेटी पढाओ, या योजनेचा सुरुवात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २२ जानेवारी २०१५ रोजी केली. या योजनेअंतर्गत देशातील १०० जिल्ह्यांची निवड केली आहे. मुलींचे प्रमाण कमी असलेल्या महाराष्ट्रात राज्यातील १० जिल्ह्यांचा समावेश होतो. देशातील मुलींच्या लिंग गुणोत्तरातील घट थांबवणे आणि महिला सबलीकरणाला चालना देणे हा या उजनीचा उद्देश आहे.

**७) सुकन्या समृद्धी योजना**

ही छोटी योजना असून मुलींचे भविष्य सुरक्षित करणे हा या योजनेचा उद्देश आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी मुलीचे दहा वर्ष पूर्ण होण्यापूर्वी तिचे खाते उघडावे लागेल व २१ वर्षे पूर्ण होईपर्यंत पैसे भरावे लागतील या खात्यात किमान २५० रुपये गुंतवू शकता. जास्तीत जास्त दीड लाख रुपये गुंतवू शकता.

**८) महिला शक्ती केंद्र योजना**

२०१७ मध्ये ही योजना सुरू करण्यात आली. या योजनेचा उद्देश महिलांना सक्षम करणे हा आहे. तुझी अंतर्गत देशभरात सामाजिक सहभागातून महिलांचे सक्षमीकरण करण्याचे काम केले जात आहे.

**९) पंतप्रधान उज्वला योजना**

देशात अजूनही अशी महिलांची संख्या आहे की ज्या अजूनही गॅस सिलेंडर वापरत नाही. या महिला आजही स्वयंपाकासाठी लाकूड व इतर साधनांचा वापर करतात. अशा स्थितीत महिलांना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो.याशिवाय याचा परिणाम महिलांच्या आरोग्यावरशी संबंधित आहे .ही, समस्या लक्षात घेऊन भारत सरकारने प्रधानमंत्री उज्वला योजना सुरू केली आहे.

**१०) महिला व बाल विकास विभागाच्या योजना**

आर्थिक दृष्ट्या गरीब कुटुंबांमधील १८ ते ४० वर्ष वयोगटातील महिलांना व्यावसायिक प्रशिक्षण देऊन त्या आधारे महिला कुटुंबाचा उदरनिर्वाह करू शकतात यासाठी स्वयंसेवी संस्था मार्फत महिला प्रशिक्षण केंद्र चालवण्यात येतात.

**निष्कर्ष**

१) भारत सरकारने स्त्रियांसाठी राबवलेल्या योजनांमुळे महिलांचा सामाजिक, आर्थिक व शारीरिक शैक्षणिक ,सांस्कृतिक , विकास झालेला आहे.

२) आर्थिक दृष्ट्या दुर्बल असणाऱ्या स्त्रियांना स्वयंरोजगार उपलब्ध होण्यास मदत होत आहे.

३) महिला विकास कायद्याबाबत जनजागृती होत आहे.

४)स्त्रियांना योजनांमार्फत वेगवेगळ्या व्यवसायाचे प्रशिक्षण दिल्याने महिलांमध्ये वेगवेगळी कौशल्य विकसित होत आहे.

**समारोप**

भारत सरकारने स्त्रियांसाठी राबवलेल्या योजनांमुळे स्त्रियांचा सामाजिक आर्थिक तसेच राजकीय विकास होतो. महिला सक्षमीकरण हे विकासाचे ध्येय साध्य करण्यासाठी आवश्यक साधन आहे सरकारी आणि इतर खाजगी संस्था सार्वजनिक क्षेत्रातील नेतृत्व पदावर असणाऱ्या स्त्रियांना पाठिंबा देणे. स्त्रियांसाठी राबवल्या जाणाऱ्या योजनांमुळे महिलांना प्रोत्साहित केले जात आहे या भारत सरकारच्या स्त्रियांसाठी राबवल्या जाणाऱ्या योजनांमुळे महिला सबलीकरण व सक्षमीकरण होण्यास मदत होणार आहे.शासनाच्या योजना प्रत्यक्षात आणावयाची असेल पुरुषांच्या बरोबर महिलांच्या मानसिकतेत बदल होणे गरजेचे आहे. त्याचबरोबर या शासनाच्या योजनांची अंमलबजावणी त्याचे कायदे तळागाळातील समाजापर्यंत पोहोचवणे गरजेचे आहे. तर स्त्रियांचा परिवर्तनवादी चेहरा जगासमोर येईल.

**संदर्भसूची**

१) वार्षिक अहवाल २०१९-२० महिला आणि बाल विकास मंत्रालय( भारत सरकार)
२) रंजन कोळंबे सर - मानव संसाधन विकास आणि मानवाधिकार, पुणे भगीरथ प्रकाशन २०१९
३) सुधा मूर्ती - अस्तित्व
४) प्रा. डॉ वर्षा गंगणे - स्त्री सक्षमीकरणाची वाटचाल आणि वास्तव २०१९